# वाई पोलीस स्टेशन

**सोनगिरवाडी, तालुका वाई, जिल्हा-सातारा**

**E-mail : waips.satara@mahapolice.gov.in**

**मोबाईल नंबर :- ९२२३००६१४७**


**प्रेस नोट दि.०२/०३/२०२६**

**वाई तालुक्यातील केबल चोरी करणारा आरोपी शेतक-यांचे मदतीने गजाआड करुन २,९६,४००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल केला हस्तगत**

दिनांक २८/०३/२०२६ रोजी मौजे आसरे गावातील शेतकऱ्यांनी केबल चोरी करणाऱ्या एका संशयित इसमास पकडुन ठेवल्याची बातमी वाई पोलीस ठाणेस प्राप्त झालेनंतर वाई पोलीस ठाणेस नेमणुकीस असलेले पोलीस हवालदार ३०५ इथापे,पोलीस अंमलदार श्रावण राठोड,नितीन कदम यांनी आसरे येथे घटनास्थळी जावुन संशयित इसम नामे अक्षय विलास गायकवाड यास ताब्यात घेऊन वाई पोलीस ठाण्यात आणुन त्याचेकडे सखोल चौकशी केली असता,त्याने आसरे,आकोशी,कोंढवली परिसरात चोरी केल्याचे कबुल केले त्यानुसार आरोपी नामे अक्षय विलास गायकवाड रा.वर्णे अंगापुर ता.सातारा जि.सातारा याचेकडुन तो वापरत असलेले वाहन क्रमांक एमएच ११ डिके ३५९७ जप्त करण्यात आलेले असुन त्याने गुन्हयात चोरी केलेल्या मुद्देमालाबाबत त्याचेकडे कसुन चौकशी केली असता,तो प्रथम उडवाउडवीची उत्तरे देत होता.परंतु त्यास अधिक विश्वासात घेऊन विचारपुस केली असता आरोपी याचेकडुन ७६० मिटर लांबीची केबल,४३ किलो तांब्याची तार असे एकुण **२,९६,४००/-** रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.आरोपीकडुन वाई पोलीस ठाणेकडील पुढील गुन्हे उघड झालेले आहेत.

| अ.क्र | गुन्हा रजि.नंबर | कलम |
|---|---|---|
| १ | ४४/२०२६ | भारतीय न्यायसंहिता कलम ३०३(२) |
| २ | ६५/२०२६ | भारतीय न्यायसंहिता कलम ३०३(२) |
| ३ | ६६/२०२६ | भारतीय न्यायसंहिता कलम ३०३(२) |
| ४ | ६८/२०२६ | भारतीय न्यायसंहिता कलम ३०३(२) |
| ५ | ६९/२०२६ | भारतीय न्यायसंहिता कलम ३०३(२) |

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री तुषार दोशी सो,अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती वैशाली कडुकर मॅडम,उपविभागीय पोलीस अधिकारी श्री सुनील साळुंखे सो यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री जितेंद्र शहाणे,तपासपथक प्रमुख श्री सुधीर वाळुंज पो.हवा इथापे,पो.कॉ नितीन कदम,हेमंत शिंदे,विशाल शिंदे,श्रावण राठोड पोलीस पाटील संदेश वैराट गणेश जरंडे,सचिन सणस यांचे व शेतकरी आसरे यांनी केलेली असुन वाई तपासपथकाचे मा.पोलीस अधीक्षक तुषार दोशी सो व श्रीमती वैशाली कडुकर मॅडम यांनी अभिनंदन केलेले आहे.पुढील तपास पो.हवा ३०५ इथापे हे करीत आहेत.

**(मा.पोलीस अधीक्षक सो सातारा यांचे मान्यतेने)**

**प्रति,**

**सर्व संपादक,सातारा.**